Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0015

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

# संत चोखामेळा यांच्या अभंगातील गुरु महात्म्य

**प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ**
श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय,
बोरगाव मंजू, जि. अकोला 444 102
मोबाईल 99 211 32 764
ई-मेल – psnirmal2608@gmail.com

**सारांश**

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील एक प्रमुख संप्रदाय असून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचं महत्त्वपूर्ण कार्य या संप्रदायाने केले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांच्या समकालीन असणाऱ्या संत चोखोबांना आपल्या जीवनात अपमान, अन्याय, मनस्ताप सहन करावा लागला. तरीही त्यांनी विपरीत परिस्थितीतही आपली स्थितप्रज्ञता ढळू न देता अनेक कठीण प्रसंगांना ते धैर्याने सामोरे गेले. संत नामदेवांच्या प्रभावळीतील मानवधर्माचा पुरस्कार करणारा महान संत म्हणून संत चोखामेळा यांचे नाव घेतले जाते. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या भक्तीसोबतच गुरु महात्म्यही त्यांच्या अभंगामधून स्पष्ट होते. अशा या सेवाभावी, पवित्र आणि स्वच्छ मनाच्या चोखोबांसारख्या संतांच्या अभंगातील विचार हे कालातीत वाटतात.

**बीज शब्द**
गुरु भक्ती, वारकरी संप्रदाय, अभंग, विठ्ठल

**प्रस्तावना**

संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला संतांच्या विचारांचा समृद्ध वारसा लाभलेला असून तेराव्या शतकात वारकरी संप्रदायाने महाराष्ट्रातील अठरा पगड जातीतील लोकांवर आपला ठसा उमटविला. वारकरी संप्रदायाच्या निर्मिती संदर्भात बहिणाबाई शिरूरकर म्हणतात,

**संतकृपा झाली | इमारत फळा आली |**
**ज्ञानदेवे रचिला पाया | उभारिले देवालया ||**
**नामा तयाचा किंकर | तेणे केला हा विस्तार**
**जनार्दन एकनाथ | खांब दिला भागवत ||**
**तुका झालासे कळस | भजन करा सावकाश |**
**बहिणे फडकती ध्वजा । निरूपण केले ओजा।।**

संत ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या वारकरी संप्रदायाची इमारत आजही भक्कमपणे उभी आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अठरा पगड जातीतील संत एकत्र आले. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर, नामदेवांपासून संत तुकाराम, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत जनाबाई, कान्होपात्रा अशा अनेक संतांनी समाजातील उच्च निचता, विषमता नष्ट करून समाजात समता प्रस्थापित करण्याचा मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारला.

संत ज्ञानेश्वर, नामदेवांच्याच काळातील एक महान संत म्हणून संत चोखामेळा यांना ओळखले जाते. वारकरी संप्रदायातील संत पंढरपूरच्या विठ्ठलाला आपले दैवत मानतात. संत चोखामेळा हे विठ्ठलाचे निस्सिम भक्त होते. त्यांचा जन्म महार जातीत झाला. ते एक अभंगात म्हणतात,

**हीन याती माझी देवा । न घडे तुझी सेवा ।।**
**मज दूर हो म्हणती । तुज भेटू कोणत्या रीती ।।**

तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे विदारक वास्तव संत चोखामेळा यांनी व्यक्त केले. संत चोखोबांची पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, मेहुणा बंका आणि बहिण निर्मळा हे सर्व काबाडकष्ट करीत असताना भक्तीभावाने विठ्ठलाचे नामस्मरण आणि गुणसंकीर्तन करीत असत. संत चोखोबांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील मेहुणचा, की सोलापूर जिल्ह्यातील

मंगळवेढ्याचा, की पंढरपूरचा याविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद आढळून येतात. असे असले तरी वारकरी संप्रदायातील एक महान संत म्हणून ते ओळखले जातात. तत्कालीन सामाजिक विषमतेचे, वर्णव्यवस्थेचे चटके संत चोखामेळा यांना सहन करावे लागले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे परमभक्त असलेले संत चोखामेळा आपल्या अभंगात म्हणतात,

**ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ।।**
**कमान डोंगी परी तीर नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ।।**
**नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगे । काय भुललासी वरलीया रंगे।**
**चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ।।**

आपण वरवरच्या रंगाला पाहून आपले मत बनवू नये. आकाराला पाहून मत बनवू नये, तर त्या व्यक्तीच्या बाह्यांगापेक्षा त्याच्या अंतरंगास पाहावे. त्याचे अंतरंग कसे आहे त्यावरून त्या व्यक्तीची पारख करावी. असा उपदेश संत चोखोबा करतात.

**विषय विवेचन**

मानवी जीवनात गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मनुष्याच्या जन्मानंतर त्याचा पहिला गुरु ही त्याची आई असते. बाल्यावस्थेतच त्याच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याचे काम ती करीत असते. मातृऋण- पितृऋण आणि गुरूचे ऋण कधीच फिटत नाही. जीवनाला आकार देण्याचे, बळ देण्याचे काम गुरु करीत असतात. संत ज्ञानेश्वरांचे गुरु निवृत्तीनाथ, संत नामदेवांचे गुरु विसोबा खेचर, संत एकनाथांचे गुरु जनार्धन स्वामी, संत तुकारामांचे गुरु बाबाजी चैतन्य, तर संत चोखामेळा यांचे गुरु नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी।। असा संदेश देणारे संत नामदेव हे असून त्यांच्या विषयीचे महात्म्य संत चोखामेळा यांच्या अनेक अभंगातून स्पष्ट होते. संत चोखामेळा यांच्या गुरुभक्ती संदर्भात डॉ. आरती कुळकर्णी लिहितात, "वारकरी संप्रदायाप्रमाणे उपास्य दैवत विठ्ठलाची आराधना, गुरुभक्तीचे सामर्थ्य इत्यादी विषयाचे वर्णनही यातून येते. चोखोबांनी 'धन्य नामदेवा| केला उपकार जीवा|| या शब्दात गुरु नामदेवांचे ऋण मान्य करून विठ्ठलविषयक अपार श्रद्धा व्यक्त केलेली आहे."[1] संत चोखामेळा यांना आयुष्यभर वर्णव्यवस्थेचे चटके सहन करावे लागले. संत चोखोबा यांना विठ्ठल भक्तीचे वेड लागले होते. देव आपल्या सोबत जेवतो, आपल्या सोबत बोलतो असा प्रत्यय त्यांना वेळोवेळी आला. संत चोखोबा कष्ट करीत असताना मातीच्या ढिगाऱ्याखाली आल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. संत नामदेवांनी मातीच्या ढिगाऱ्याखालील अस्थी शोधून ज्यातून विठ्ठलाचा नामघोष होईल ती अस्थी चोखोबांची असे मानून चोखोबांच्या अस्थी गोळा करून पंढरपुरास आणून महाद्वारी चोखोबांना महासमाधी दिली आणि आपली समाधीसुद्धा चोखोबांच्या शेजारीच असावी अशी आपली इच्छा व्यक्त केली. संत नामदेवांच्या भक्तांनी त्यांची ती इच्छा पूर्ण केली. अशा संत नामदेवांविषयी, आपल्या गुरुविषयी त्यांच्या मनात प्रचंड आस्था होती. संत चोखामेळा आपल्या अभंगात म्हणतात,

**चोखा म्हणे अवघा संदेह फिटला | उपकार हा केला नामयाने ||**
**चोखा म्हणे अवघे नामया पावले | अवघेची दाविले तेने मज ||**
**चोखा म्हणे धन्य नामया तू गुरु | फेडीला अंधार जीवित्वाचा ||**
**चोखा म्हणे तुम्ही माय हो माऊली | कृपेची साउली नामदेवा ||**

संत चोखोबांच्या मनात आपल्या गुरूविषयी अपार श्रद्धा होती. हेच या अभंगातून स्पष्ट होते. संत चोखामेळा यांच्या गुरुभक्ती विषयी डॉ. सुभाष सावरकर लिहितात, "संतश्रेष्ठ नामदेवांचे शिष्यत्व पत्करल्यानंतर मात्र चोखोबांचे विश्वच बदलले."[2]

संत चोखोबांना जीवनभर कष्ट, अपमान आणि अवहेलनाच सहन करावी लागली. परंतु संत नामदेवांसारख्या महान गुरूमुळे त्यांच्या आयुष्यात एक वेगळी ऊर्जा निर्माण झाली. संत चोखोबा हे अत्यंत सेवाभावीवृत्तीचे असून त्यांनी खानपान आणि अन्य व्यवहारातही त्यांनी पावित्र्य जोपासले. संत ज्ञानेश्वर, नामदेवांचा कालखंड हाच चोखोबांचा कालखंड होय. संत ज्ञानेश्वर, नामदेवांचे ते समकालीन होते. वारकरी संप्रदायातील संतांनी विठ्ठल महित्म्या आपल्या अभंगांमधून वर्णन केला. संत चोखोबा सुद्धा याला अपवाद नाहीत. विठ्ठल महिमा सोबतच त्यांनी गुरु महात्मेही आपल्या अभंगातून वर्णन केले.

**धन्य धन्य नामदेव | माझा निरसला भेव ||**
**विठ्ठल मंत्र त्रिअक्षरी | खून सांगितली निर्धारी||**
**ठेवोनी माथा हात | दिले माझे मज हित ||**

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0015

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

**दाविले तारूं | चोखा म्हणे माझा गुरु ||**

वरील अभंगातून संत चोखोबांची गुरुभक्ती स्पष्ट होते. ते म्हणतात, हे नामदेवा, तुम्ही धन्य असून माझ्या मनात असलेली भीती तुम्ही दिलेल्या 'विठ्ठल' या तीन अक्षरी मंत्रामुळे पूर्णपणे नष्ट झाली. माझ्या डोक्यावर प्रेमाचा, आपुलकीचा हात ठेवून माझे हित कशात आहे याविषयी उपदेश करून माझ्या गुरूंनीच मला जीवनात तरुन जाण्याचा आदर्श मार्ग दाखविल्याचे संत चोखोबा म्हणतात.

संत चोखोबांच्या गुरुभक्ती विषयी ह.भ.प. ऋषी घुसळकर महाराज म्हणतात, "संत नामदेव महाराज हे चोखोबांचे गुरु असून विठ्ठल हा त्रिअक्षरी मंत्र त्यांनीच चोखोबांना दिला. चोखोबांच्या मनात आपल्या गुरु विषयी नितांत आदर व प्रेम होते. "[3]

वारकरी संप्रदायाची ही चळवळ ज्ञानेश्वर, नामदेवांच्या कालखंडात संत चोखोबांनी समृद्ध केली. अठरा पगड जातीतील वारकरी संप्रदायातील संतांच्या सदविचारामुळे महाराष्ट्राची वेगळी ओळख निर्माण झाली.

**माझे सुख मज दाखविले | पावन केले तिन्ही लोकी ||**
**नवलाव झाला नवलाव झाला | हृदयीच दावीला देव मज ||**
**निवारोनि भव ताप | दाविले रूप प्रत्यक्ष ||**
**चोखा म्हणे नामदेवा | चुकविला हेवा जन्ममरण ||**

संत नामदेवांनी माझ्या जीवनात सुख निर्माण केले. तिन्ही लोकात पवित्र केले. माझ्या हृदयात प्रत्यक्ष ईश्वराने दर्शन केले. माझ्या जीवनातील दुःखाचे निवारण करून मला प्रत्यक्ष ईश्वराचे रूप दाखविले. एवढेच नव्हे तर संत नामदेवांनी माझ्या जन्ममरणाच्या फेऱ्या चुकविल्या. असे उद्गार संत चोखोबा अभिमानाने काढतात. तर एका अभंगात गुरु महात्म्य स्पष्ट करताना संत चोखामेळा म्हणतात,

**कोणाचा संग धरू कोणासाठी | तो दुःखाचीच मिठी पडे तेणे ||**
**म्हणोनी नामयाचे धरीयले पाय | आठविता होय समाधान ||**
**सुखाचे सुख मज दावियेले डोळा | आनंद सावळा विटेवरी ||**
**चोखा म्हणे माझा नामदेव प्राण | घालीन लोटांगण जीवे भावे ||**

संत चोखोबा हे विठ्ठल भक्त तर होते तेवढ्याच प्रेमाने, आपुलकीने, जिव्हाळ्याने ते संत नामदेवांचे सुद्धा नाव घेतात. संत नामदेवांनी आपल्या जीवनात आनंद निर्माण केला. कोणाची संगत धरावी, कोणाची धरू नये, काय करावे, काय करू नये, त्यांच्या सहवासात माझे जीवन उजळून निघाले. म्हणूनच मी संत नामदेवांचे चरणी गेलो. मी संत नामदेवांच्या चरणी जिवेभावे कृतज्ञभाव व्यक्त करतो, लोटांगण घालतो. संत चोखोबांनी आयुष्यभर कष्ट उपसले, अपमान सहन केला, परंतु आपल्या गुरूंच्या म्हणजे नामदेवाच्या सहवासामुळे आपण धन्य झाल्याचे संत चोखोबा सांगतात. संत चोखोबा संदर्भात र. रा गोसावी लिहितात, "आपत्तींना तोड देऊन उजळून निघालेले चोखोबांचे आणि त्यांच्या परिवाराचे पारमार्थिक जीवन म्हणजे सर्वसामान्यांच्या जीवनात ब्रह्मविद्येचा सुकाळ झाल्याची साक्षच मानावी लागेल."[4]

वारकरी संप्रदायातील संतांनी विविध विषयांवर अभंग रचना केली. समाजातील रूढी, परंपरा, चालीरीती यावर कठोर शब्दात ताशेरे ओढले. त्यासोबत गुरु महात्मेही वारकरी संप्रदायातील संतांनी आपल्या अभंगातून मांडले. त्याचाच प्रत्यय संत चोखामेळा यांच्या अभंगातून येतो. आपल्या गुरु विषयीचा कृतज्ञभाव त्यांच्या अनेक अभंगांमधून स्पष्ट होतो.

**समारोप**

महाराष्ट्रामध्ये जे विविध संप्रदाय आहेत त्यामध्ये वारकरी संप्रदाय संपूर्ण महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणावर असून सामाजिक विषमता नष्ट करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वारकरी संप्रदायातील संतांकडून झालेले दिसून येते. प्रत्येक व्यक्तीला आपले जीवन समृद्ध व्हावे असे वाटते. त्याकरिता योग्य आणि सकारात्मक मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्याकरिता मानवी जीवनात गुरूची आवश्यकता आहे. याचेच प्रतिबिंब संत चोखोबांच्या अभंगातून पडलेले दिसून येते.

**निष्कर्ष**

1. संत चोखोबांच्या अभंगातून त्यांचा जीवनाविषयीचा सकारात्मक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0015

2. गुरूविषयीचा प्रचंड आदर संत चोखामेळा यांच्या अभंगातून दिसून येतो.
3. वारकरी संप्रदायातील संत पंढरपूरच्या विठ्ठलाला आपले दैवत मानतात.
4. विठ्ठल भक्तीचा जागर वारकरी संप्रदायातून होतो.
5. मानवी जीवन सुखी, समृद्ध आणि आनंदी करण्याचे सामर्थ्य वारकरी संप्रदायांमध्ये आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. कुलकर्णी डॉ. आरती, "संत चोखामेळा, संत साहित्य आणि समाज प्रबोधन(संपा.), भगत. रा. तु., दिलीपराज प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, प्रथम आवृत्ती, 15 सप्टेंबर 2005, पृष्ठ 98
2. सावरकर डॉ. सुभाष, "संत वांड्मयाचे जनसाहित्य मूल्य", मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, प्रथम आवृत्ती, 28 मार्च 2015, पृष्ठ 138
3. घुसरकर महाराज ऋषी, प्रस्तावना, संत चोखामेळा महाराज सार्थ गाथा, बुटे शांताराम गोवर्धन, सुनंदा प्रकाशन, अकोला, पहिली आवृत्ती, 14 जानेवारी 2002
4. गोसावी रा.र., पाच भक्ती संप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, 15 ऑगस्ट 2008, पृष्ठ 207.